**वित्तीय वर्ष सन 2016 - 17 साठी**
**<u>आयकराची परिगणना करण्याबाबत.</u>**

महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग
परिपत्रक क्रमांक - संकीर्ण 2016/प्र.क्र.71/का-1422
मंत्रालय, मुंबई 4500 032
दिनांक : 03 नोव्हेंबर, 2016

**<u>परिपत्रक</u>**

नियोजन विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांना कळविण्यांत येते की, उत्पन्न वर्ष सन 2016-17 ( कर निर्धारण वर्ष 2017-18 ) च्या आयकर परिगणनेचे काम रोख शाखेत सुरु करण्यांत आले आहे. या वर्षात आतापर्यन्त वसूल झालेल्या आयकराव्यतिरिक्त संपूर्ण वर्षासाठी देय असलेल्या उर्वरित आयकराची वसूली नोव्हेंबर, 2016 ते फेब्रुवारी 2017 या महिन्यांच्या वेतनातून करणे आवश्यक आहे. सदर उत्पन्न वर्षासाठी आयकराचे सर्वसाधारण दर खालीलप्रमाणे आहेत.:-

| अ.क्र. | उत्पन्नाची मर्यादा | आयकराचे सर्वसाधारण दर |
|---|---|---|
| 1 | रु 2,50,000/- पर्यत | निरंक |
| 2 | रु 2,50,001/- ते रु 5,00,000/- पर्यंत | रु 2,50,000/- पेक्षा जास्त असलेल्या रकमेच्या 10% |
| 3 | रु 5,00,001/- ते रु 10,00,000/- पर्यंत | रु 25000/-+रु 5,00,000/- पेक्षा जास्त असलेल्या रकमेच्या 20% |
| 4 | रु 10,00,000/- पेक्षा जास्त | रु1,25,000/-+ रु 10,00,000/- पेक्षा जास्त असलेल्या रकमेच्या 30% |

** शिक्षण उपकर :- आयकराच्या रकमेवर ३% दराने शिक्षण उपकर लागू आहे.

*** रुपये 5,00,000/- पर्यतच्या वार्षिक उत्पन्नावर रु 2000/- पर्यत आयकरामध्ये सूट आहे.

**2.** आयकराची अचूक परिगणना करण्यासाठी, सर्व अधिकारी/कर्मचा-यांनी सोबतच्या नमुन्यात,आपल्या पॅन क्रमांकासहित ( सोबत पॅनकार्डची छायांकित प्रत जोडावी.) वेतनेतर उत्पन्न व बचतीची लेखी स्वरुपातील माहिती दि. 15 नोव्हेंबर 2016 पूर्वी रोखशाखेस उपलब्ध

करुन दयावी.सदर माहिती विहित कालमर्यादेत प्राप्त न झाल्यास, परिगणित झालेला आयकर वेतनातून कपात करण्याची कार्यवाही रोखशाखेकडून करण्यांत येईल.

3. आयकर परिगणना व वसूली याबाबत रोखशाखेने तयार केलेली विवरणपत्रे तपासून ती अंतिम करण्याची तसेच आयकर परिगणनेसाठी दिलेल्या बचतीच्या पावत्या/प्रमाणपत्रे माहे फेब्रुवारी 2017 पूर्वी रोखशाखेस सादर करण्याची, जबाबदारी संबंधित अधिकारी/कर्मचारी यांची आहे, या कालावधीत बचतीबाबतची माहिती प्राप्त न झाल्यास उर्वरित आयकराची वसूली फेब्रुवारी 2017 च्या वेतनातून करण्यात येईल. याची कृपया नोंद घ्यावी.

( रोहिणी कुलकर्णी )
कार्यासन अधिकारी तथा आहरण व संवितरण अधिकारी
नियोजन विभाग.

प्रति,

नियोजन विभागातील सर्व अधिकारी/कर्मचारी, प्रत माहितीसाठी,
अपर मुख्य सचिव,नियोजन विभाग,यांचे स्वीय सहाय्यक.

**( परिपत्रक क्र.संकिर्ण 2016/प्र.क्र.71/का-1422 दि.03.11.2016 सोबतचे विवरणपत्र )**

**इतर उत्पन्न व बचतीचा तपशील.**

नांव व पदनाम -

पॅन क्रमांक ( पॅनकार्डची छायांकित प्रत जोडावी .) :

भ्रमणध्वनी क्रमांक :

---

अ) उत्पन्नाव्यतिरिक्त इतर स्त्रोतातून मिळालेले उत्पन्न
रुपये

१.

२.

३.

ब) १. शासकीय घरबांधणी अग्रिमावरील प्रदेय व्याज ( Accrued Interest )
२. घरबांधणी कर्जाचे व्याज.

क) आयकर सवलतीसाठी पात्र असलेल्या बचतीची माहिती :-

१. वैदयकीय खर्चाचा विमा *(Mediclaim)* ( मर्यादा रु. 25000/-)
२. अपंग/वैदयकीय सवलत ( स्वत:/अवलंबित )
(सवलतीसंदर्भात प्राधिकृत अधिका-याच्या प्रमाणपत्राची प्रत जोडणे )
३. मुख्यमंत्री / पंतप्रधान सहाय्यता निधीस देणगी
४. सार्वजनिक भविष्य निर्वाह निधी *(PPF)*
५. जीवन विमा / पोस्टल विमा
६. म्युच्युअल फंड
७. युनिटस
८. राष्ट्रीय बचत प्रमाणपत्रे ( सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात खरेदी केलेली )
९. खाजगी गृहकर्जाच्या मुद्दलाची परतफेड
१०. शैक्षणिक शुल्क

प्रमाणित करण्यांत येते की, मी वर नमुद केलेल्या तपशिलाप्रमाणे बचत केली आहे/करणार आहे.

( अधिकारी व कर्मचारी स्वाक्षरी )
पद -.